स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 27—10—2017** रोजी **दुपारी 03—00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **श्री. संदिप चंद्रभान जाधव** | **सभापती** |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 6. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 7. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 8. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 9. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 10. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 11. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 12. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 13. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 14. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 15. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 16. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 180:—** {आसीनगर झोन 09} प्रभाग क्र. 3 (क) अंतर्गत मॉ. बम्लेश्वरी नगर ते पिवळी नदी पर्यंत पावसाळी नालीचे बांधकाम करण्यास्तव रु. 49,99,896/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करून निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 181:—** {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. २४ ब, साखरकरवाडी येथील मेनरोड ते संतगुरु घासीदास हॉल आणि ललवा पान दुकान ते सातपुते यांचे

घरापर्यंत सिमेंट रोडचे बांधकाम करण्यास्तव रु. ३९,९९,९७१/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A२२००१३३०८०२ मधून आर्थिक वर्ष २०१७—१८ रु. ४०.०० लक्ष राशीची तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

**ठराव क्रमांक 182:—** {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 51 ब (नवीन 16) अंतर्गत वसंतनगर येथील मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण व रुंदीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त एकूण 03 निविदांपैकी निम्नतम निविदाकार मे. प्रेमचंद राचुमल हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्ष 1.99 टक्के कमी दराची निविदा रुपये 37,99,916/— स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क्र. (370) A22001330801 अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 183:—** {कर विभाग} मे. सायबरटेक सिस्टिम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लिमिटेड व्दारा कार्यादेश क्र. 271/AD/2015 दिनांक 06.11.2015 अंतर्गत PART 'B' अंतर्गत करण्यात येत असलेल्या नागपूर महानगरपालिका सीमेतील हाऊस युनिटच्या सर्वेक्षणाचा अहवाल प्रत्येक 15 दिवसाचे आंत स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्याचे निर्देश स्थायी समिती ठराव क्र. 104 दिनांक 07.07.2017 अन्वये आहेत. हया अनुषंगाने अहवाल पूढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे. दिनांक 25.09.2017 रोजी पर्यंत मे. सायबरटेक सिस्टिम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लिमिटेड व्दारा सर्वेक्षणात data collect करण्यात आलेल्या हाऊस युनिटची संख्या 3,93,687 असून त्यापैकी 3,10,178 हाऊस युनिटचा data QC (Quality Check) करून संबंधित Assessing Authority कडे approval करीता Forward केलेला आहे. 3,10,178 हाऊस युनिट पैकी संबंधित Assessing Authority व्दारा 2,06,286 हाऊस युनिट चा data approved झालेला आहे. व 81,127 हाऊस युनिटचा data reject झालेला आहे. Approved 2,06,286 हाऊस युनिट पैकी 1,94,024 हाऊस युनिट करीता ठराव क्र. 72 दिनांक 04.03.2015 च्या मंजूर पध्दतीन्वये करयोग्य मुल्य निश्चित करून कर निर्धारण पुस्तक नागरिकांना बघण्यासाठी संबंधित झोन कार्यालयात ठेवण्यात आलेले आहेत. विस्तृत माहिती धारिकेतील पृष्ठ क्र .7 वर टांचण तक्त्यामध्ये उपलब्ध आहे. माहितीस्तव सादर.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन, स्थायी समितीने दिलेल्या उद्यीष्ठा प्रमाणे दिलेल्या मुदत वाढीमध्ये काम पुर्ण करुन घेण्याची जबाबदारी हि विभागाची राहिल याची नोंद घ्यावी, उप निगम आयुक्त यांनी झोन स्तरावर आढावा बैठकी घ्याव्या व त्याचा अहवाल स्थायी समिती समोर सादर करावा या सुचनेसह समितीने विषयाची नोंद घेतली.

**ठराव क्रमांक 184:—** {लोककम झोन 06} प्रभाग क्र. १८ क अंतर्गत रतन कॉलनी येथे नाल्याची आर.सी.सी. भिंत व स्लॅबचे बांधकामास्तव तयार केलेल्या रू.३९,७८,०१५/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. A43901370812 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 185:—** {लोककर्म झोन 01} शासन निर्णय क्र. डेस्क—12/एमयुएन3/कावि 1643/2016 जिल्हाधिकारी दि. 05.11.2016 अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत पश्चिम विधानसभा मतदार क्षेत्रामध्ये प्रभाग क्र. 23, फ्रेंडस कॉलोनी

येथे रस्त्याचे डांबरीकरण करणेकरिता रु. 1514105/– चे प्राकलन मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रशासकीय मंजुरीकरिता पाठविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 186:–** {लोककर्म झोन 01} प्रभाग क्र. 38 'ब' अंतर्गत बजरंग नगर (आनंद नगर) येथील नाल्याच्या भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रू. 33,14,797/– (तैत्तीस लक्ष, चौदा हजार, सातषे सत्यान्नव फक्त) रकमेच्या प्राकलनास मंजुरी करण्याचा तसेच पद क्र. A42001374612 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 187:–** {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र ११, ब जयदुर्गा सोसायटी गोधणी रोड येथे कंपाउडवॉल आणि फुटपाथचे काम करणेबाबत रू. ३०,३८,६८२/– (तीस लक्ष अडतीस हजार सहाशे ब्यांशी फक्त ) जुने पद क्रमांक ७७० व नविन पद क्र. A४२००१३७४६१५ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 188:–** {लोककर्म झोन 01} शासन निर्णय क्र. डेस्क–12/एमयुएन 3/कावि 1643/2016 जिल्हाधिकारी दि. 05.11.2016 अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत दक्षिण–पश्चिम विधानसभा मतदार क्षेत्रामध्ये प्रभाग क्र. 16, लक्ष्मीविहार येथील मोकळया मैदानास सुरक्षा भिंत व पाथवे बांधकाम करणेकरिता रु. 1494997/– चे प्राकलन मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रशासकीय मंजुरीकरिता पाठविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 189:–** {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र ११, अ मानकापुर घाट येथे नाल्याचे भिंतीचे बांधकाम करणेबाबत रू. ९४,८१,००४/– (चौऱ्यानउ लक्ष ऐक्यांशी हजार चार फक्त ) जुने पद क्रमांक ६१८ व नविन पद क्र. A४३९०१३७०८१२ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 190:–** {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. २६ – क अंतर्गत श्री कोठे ते शक्तीमाता नगर नाल्यापर्यंत सिमेंट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव **रूपये ३९,४४,७३०/–** च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 191</u>:—** प्रभाग क्र. ०४ अ/ब, मधील बिनाकी गृहनिर्माण सहकारी
**{लोककर्म झोन 08}** संस्था मर्या. ख.क्र. १८/१, मौजा — कळमना येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव रु. २९,९९,९२७/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर काम पद क्र. ए २२००१३३०८०३ (६८२) फिक्स प्रायरीटी मधून स्थायी समितीने प्रति नगरसेवक रु. १५.०० लक्ष उपलब्ध करुन दिलेल्या राशी मधून घेण्यात आलेले आहे.

**<u>ठराव क्रमांक 192</u>:—** प्रभाग क्र ११, अ बन्धुनगर, बाबा फरीदनगर झिंगाबाई
**{लोककर्म झोन 10}** टाकळी येथे सिवर लाईनचे बांधकाम करणेबाबत रू. ३८,२१,०४५/— (अडतीस लक्ष ऐकवीस हजार पंचेचाळीस रू. फक्त ) जुने पद क्रमांक ६१९ व नविन पद क्र. A४३९०१३७१९१३ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 193</u>:—** प्रभाग क्र १९ ड येथील राम मंदीराच्या मागील भागापासून
ते **{लोककर्म झोन 06}** कुंभारपुरा पर्यंत नाल्याचे संरक्षण भिंतीचे बांधकामास्तव तयार केलेल्या **रू.८३,३४,६४३/—** रकमेच्या प्राकलनास पद क्र. A42001374615 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 194</u>:—** नागपूर महानगरपालिका, समाज कल्याण विभागामार्फत
**{समाजकल्याण विभाग}** ''अंत्योदय योजना'' अंतर्गत बेरोजगार दिव्यांगाना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने दिव्यांग व्यक्तींकरिता ई—रिक्षा वाटपासंदर्भात आवश्यक अटी व शर्तीनुसार लाभार्थी निवडावयाचा तसेच ई—रिक्षा वाटपाच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

'अंत्योदय योजना'' अंतर्गत दिव्यांग व्यक्तीकरिता ई—रिक्षा वाटपासंदर्भात अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहेत.

<u>अटि व शर्ती</u>

1. अर्जदाराचे 70 टक्के व त्यापेक्षा जास्त अस्थिव्यंग अपंगत्व असल्याचे (कमरे खालील) अपंग प्रमाणपत्र असने बंधनकारक आहे. त्यामध्ये ई—रिक्षा चालविण्याकरिता हात, डोळे, कान सक्षम असावे.
2. अर्जदाराने शासकीय, निमशासकीय व इतर संस्थेव्दारे ई—रिक्षा वाटप योजनेचा लाभ घेतले नसल्याचे रू. 100/— स्टॅम्प पेपरवर हमीपत्र देणे बंधणकारक राहील.
3. अर्जदाराने 1 लाख पर्यंत वार्षीक उत्पन्न दाखला सादर करणे बंधनकारक आहे.
4. अर्जदाराकडे ई—रिक्षा चालविण्याची वैध अनुज्ञप्ती व सार्वजनिक सेवा वाहन चालविण्याचे प्राधिकारपत्र/बॅज आणि लॅमिनेटड स्वरूपातील ओळखपत्र असावे.
5. अर्जदारास स्थानिक भाषेचे ज्ञान व परवाना क्षेत्रातील स्थळांची माहिती असावी.
6. अर्जदाराविरूध्द मागील 1 वर्षामध्ये कोणत्याही प्रकारचा दखलपात्र गुन्हा नोंद झाला नसल्याचा पोलीस विभागाचा दाखला.
7. अर्जदाराचे शासनाच्या, निमशासकीय किंवा खाजगी कंपनीमध्ये कायमस्वरूपी नोकरीत नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावा लागेल.
8. अर्जदाराकडे अन्य कोणत्याही प्रकारच्या वाहनाचा परवाना नसावा.
9. अर्जदार नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील रहीवासी असणे आवश्यक राहील.
10. अर्जदाराचे वय 18 वर्षा पेक्षा जास्त व 50 वर्ष किंवा त्यापेक्षा कमी असने आवश्यक राहील.

11. ई–रिक्षा मिळण्याबाबत रहीवासी क्षेत्रातील मा. नगरसेवकांचे शिफारस पत्र बंधनकारक राहील.

उपरोक्त निकषाप्रमाणे ''अंत्योदय योजना'' अंतर्गत दिव्यांगाकरिता सौर उर्जावर किंवा बॅटरीवर चालणारे तीन चाकी (ई–रिक्षा) वाहन खरेदीकरिता सन 2017–2018 च्या अर्थसंकल्पात रू. 100/– लक्षाची तरतुद करण्यात आली असल्याने Technical Specification नुसार प्रत्येकी एक नग ई – रिक्षाकरिता रू. 1,25,570/– राशीचे प्राकलणीय दराप्रमाणे **रू. 1,25,570 X 70 लाभार्थी = रू. 87,89,900/– (सत्यांशी लक्ष एकोन्नवद हजार नऊशे रूपये) इतका** खर्च अपेक्षीत आहे.लाभार्थ्याची संख्या निश्चितीकरिता दहा झोनमधील प्रत्येकी 7 लाभार्थ्यांना ज्यांनी नमुद अटी व शर्तीची पुर्तता केलेली आहे अशा लाभार्थ्यांना ई–रिक्षा उपलब्ध करून देण्याचे विभागाचे मत आहे. प्रत्येक झोनमार्फत 7 लाभार्थ्यांपेक्षा जास्त लाभार्थ्यांचे ज्यांनी नमुद अटी व शर्ती नुसार परिपुर्ण प्रस्ताव सहा. आयुक्त यांच्या मार्फत समाज कल्याण विभागास सादर केल्यास प्रत्येक झोन मधील पात्र लाभार्थ्यांच्या संख्येनुसार समाज कल्याण विभागामार्फत ईश्वर चिठ्ठी काढुन 7 लाभार्थ्यांचे निवड करण्याचे विभागाचे मत आहे किंवा एखादया झोन मार्फत 7 लाभार्थ्या पेक्षा कमी प्रस्ताव प्राप्त झाल्यास उर्वरित झोन मधील लाभार्थ्यांना ज्यांनी अटी व शर्तीची पुर्तता केलेली आहे अशा लाभार्थ्यांना ई–रिक्षा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्याचे विभागाचे मत आहे.

लाभार्थ्यांची संख्या निश्चिती करण्याकरिता झोन सहा. आयुक्त यांच्या मार्फत नमुद अटी व शर्ती नुसार प्रस्ताव मागवून समाज कल्याण विभागामार्फत पात्र/अपात्र लाभार्थ्यांची यादी निश्चित करून शासन निर्णय दि. 5 डिसेंबर 2016 नुसार प्रति ई–रिक्षा रू. 1,25,570/– प्रमाणे ई–रिक्षा खरेदी करण्याबाबत निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना ठरविण्यात आलेली किंमत व Technical Specification बाबत लेखी कळवून त्यांचातर्फे वस्तु खरेदी केल्यानंतर त्यांच्या बॅक खात्यावर अनुदानांची रक्कम विभागामार्फत शहनिशा केल्यानंतर जमा करणे या कार्यवाहीची अंमलबजावणी करणे संयुक्तीक होईल.

सबब उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित कार्यवाहीची अंमलबजावणी करण्याकरिता प्रस्तावास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 195ः–**
**{सतरंजीपुरा झोन 07}**

शांतीनगर घाट येथे सौंदर्यीकरणाची कामे करण्यास्तव प्राप्त निविदापैकी मे. उल्हास एन्टरप्रायजेस यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 35,34,975/– पेक्षा 1.80 टक्के कमी दराची रू. 34,71,345/–(रूपये चौतीस लक्ष एकाहत्तर हजार तीनशे पंचेचाळीस) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क्र. 602 (A43501271705) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 196ः–**
**{मंगळवारी झोन 10}**

मंगळवारी झोन क्र. 10 च्या आर्थिक वप्र 2017–18 च्या (महसुली व्यय व भांडवली व्यय एकूण रु. 729.00 लक्ष च्या) झोनल अंदाजपत्रकाला ठराव क्र. 07 दि. 14.09.2017 अन्वये प्रभाग समितीने मंजुरी प्रदान केलेली आहे.

सबब, मंगळवारी झोन क्र. 10 च्या वर्ष 2017–18 च्या झोनल अंदाजपत्रकाला स्थायी समितीची मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 197ः—</u>** कविवर्य सुरेश भट सभागृहाचे नुकतेच लोकार्पण झालेले आहे.
**{लोककर्म विभाग}** विविध संस्थेची सभागृहाच्या आरक्षणा करीता मागणी होत आहे.

मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखालील गठीत समिती व्दारे प्रारूप नियमावली व भाडे सोबत संलग्न परिशीष्ट 'ब' प्रमाणे प्रस्तावित केलेली आहे. सदर चे प्रस्तावित भाडे डिसेंबर 2017 पावेतो तात्पुरत्या स्वरूपात लागू करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

येत्या दोन महिन्यात येणारे विदयुत शुल्क, पाणी शुल्क, स्वच्छता व देखरेख शुल्क व होणारे आरक्षण व त्यापोटी प्राप्त होणारे उत्पन्न इ. चा अभ्यास करून पुनःश्च दर निश्चितीचा प्रस्ताव सादर करण्यात येईल.

## <u>नियमावली</u>

१. सभागृहाची आसन क्षमता २००० असून लाकडी पृष्ठभागाचा ३२३० चौ.फुट/३०० चौ.मी. आकाराचा रंगमंच आहे. या सभागृहाचा वापर नाटक, संगीत, नृत्य, संम्मेलन, सांस्कृतिक व अध्यात्मिक व्याख्याने, व्यावसायीक चर्चासत्र इत्यादी कार्यक्रमा करिता करता येईल. कोणत्या प्रकारचा कार्यक्रम करावयाचा आहे याबाबतची माहिती सभागृहाचे आरक्षण करतेवेळी देणे सक्तीचे आहे. ज्या कार्यक्रमाकरिता सभागृह आरक्षित केलेले आहे त्याशिवाय इतर अन्य कार्यक्रमाला सभागृह उपलब्ध होणार नाही.
२. सभागृहाचे आरक्षण पूर्णतः ऑनलाईन पध्द्तीने करणे अनिवार्य राहील तसेच सभागृहाचे आरक्षण जास्तीत कार्यक्रमाच्या ३० दिवस व कमीत कमी ५ दिवस अगोदर करता येईल. या कालावधीतच ऑन लाईन अर्ज करावा, ३० दिवसांपूर्वी कोणताही अर्ज स्विकारल्या जाणार नाही वा त्यावर कोणतीही कार्यवाही होणार नाही.
३. सभागृहाचे आरक्षणाकरिता विहित नमुन्यात ऑन लाईन अर्ज सादर करणे अनिवार्य राहील (परिशिष्ट—अ).
४. राष्ट्रीय महत्वाचे दिवस जसे— २६ जानेवारी, १ मे, व १५ ऑगस्ट या दिवसाचे आरक्षण स्विकारण्यात येणार नाही तसेच म.न.पा. निश्चित करेल अशा काही दिवशी आरक्षण स्विकारण्यात येणार नाही.
५. आरक्षणाचे भाडेसह रू. ५०,०००/— अनामत रक्कम आकारण्यात येईल. ही रक्कम सभागृहाचे कुठलेही नुकसान न झाल्यास परत करण्यात येईल.
६. सभागृहाचे आरक्षण सकाळी ८.३० ते ११.३०, दुपारी १२.३० ते ३.३० सायंकाळी ४.३० ते ७.३० व रात्री ८.३० ते ११.३० या कालावधी करिता करण्यात येईल. प्रत्येक कालावधी करिता सोबत संलग्न तक्त्याप्रमाणे भाडे आकारण्यात येईल (परिशीष्ट—ब). पूर्ण रक्कम रोखीने/आर.टी.जी.एस.व्दारे भरल्यावर पावती प्राप्त केल्याशिवाय आरक्षण पक्के झाले असे समजल्या जाणार नाही.
७. आरक्षित केलेला कार्यक्रम सुरू होण्याचा अर्धा तास अगोदर सभागृह उपलब्ध करून देण्यात येईल. आरक्षित कालावधी नंतर जास्तीत जास्त अर्धा तासाचे आंत सभागृह संपूर्णता रिकामे करावे लागेल, अन्यथा दंडात्मक कार्यवाही केली जाईल. नोंदणी रजिस्टर मध्ये सभागृहाचा ताबा घेण्याची व सोडण्याची वेळ नोंद करून अर्जदाराने स्वाक्षरी करणे आवश्यक राहील. सभागृहाच्या जबाबदार व्यक्तीकडून वेळेच्या नोंदीची खात्री अर्जदाराने करावी अन्यथा कर्मचाऱ्यानी नोंदविलेली वेळ ग्राहय धरून भाडे आकारण्यात येईल.
८. प्रयोगा संदर्भात सर्व श्रमीक कायदे व शासकीय नियमांचे पालन करण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील. कार्यक्रमा करिता लागणारे सर्व आवश्यक परवाने, आवश्यक मान्यता संबंधित विभागाकडून जसे— (१) मा. पोलीस आयुक्त, यांचेकडील परफार्मन्स् व ध्वनिक्षेपक परवाना (२) रंगभुमी परिनिरीक्षण मंडळ प्रमाणपत्र (३) इतर आवश्यक ते शासकीय प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील तसेच अर्जदारानी प्राप्त केलेल्या परवानगीच्या प्रती कार्यक्रमाच्या २४ तासांपूर्वी व्यवस्थापका कडे जमा करणे अथवा वेब साईटवर अपलोड करणे आवश्यक राहील अन्यथा कार्यक्रम करता येणार नाही.

९. पोलीस मदतीची व्यवस्था अर्जदाराने केली पाहिजे, प्रसंगी पोलीस मदतीची आवश्यकता भासल्यास, व्यवस्थापक पोलीस मदत मागवतील व त्यापोटी आलेला संपूर्ण खर्च अर्जदारास द्यावा लागेल.

१०.महानगरपालिका/शासनाच्या अधिकृत अधिकाऱ्यांना सभागृहाच्या वापराबाबत नियंत्रणासाठी मुक्त प्रवेश राहील. तसेच प्रत्येक कार्यक्रमाकरिता रंगभुमी परिनिरीक्षण मंडळाचे सदस्य व महानगरपालिके करिता सभागृहाच्या बैठक व्यवस्थेच्या नकाशावर दाखविल्या प्रमाणे आसन क्र. AA- 8-9, AB- 1 to 5, AI- 19 to 23, AJ 11 to 15, BA- 16 to 20, एकूण २२ आसन (१.१०%) व्यवस्थापने करिता मुक्त राखुन ठेवावी लागेल त्याबाबतच्या पासेस सभागृहाच्या व्यवस्थापकाकडे कार्यक्रमाच्या कमीत कमी तीन दिवस आधी देण्यात याव्यात अन्यथा त्याची रक्कम अर्जदाराच्या अनामत रकमेतून कपात करण्यात येईल.

११.आरक्षण करतेवेळी कार्यक्रमाच्या जाहीर केलेल्या प्रकारा व्यतिरिक्त दुसरा कार्यक्रम होत असल्याचे आढळल्यास तसेच जाहिरात अथवा कार्यक्रम शासनाच्या/ महापालिकेच्या प्रतिष्ठेला बाधा येणारा वाटल्यास अथवा कार्यक्रमात अश्लिल किंवा तत्सम प्रकार आढळल्यास जमा केलेली रक्कम परत न करता कार्यक्रम कोणत्याही वेळेस बंद अथवा रद्द करण्याचा अधिकार व्यवस्थापकास राहील व होणाऱ्या नुकसानीची संपूर्ण जबाबदारी अर्जदारावर राहील तसेच आवश्यकते नुसार पोलीस कार्यवाहीपण करण्यात येईल. ( संलग्न असलेले शपथपत्र सादर करावे लागेल.)

१२.प्रयोगाच्या जाहिरातीमध्ये व तिकीटावर प्रयोग सादर करणाऱ्या संस्थेचे नांव असणे सक्तीचे आहे. एखादा कार्यक्रम मोफत असल्यास तसा उल्लेख अर्ज करतांनाच अर्जावर व तिकीटावर करणे आवश्यक राहील.

१३.जास्तीची विद्युत व्यवस्था तसेच कार्यक्रम ध्वनीमुद्रीत करावयाचा असल्यास कार्यकारी अभियंता (विद्युत) विभागाकडून पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे व याकरिता **अतिरिक्त शुल्क** द्यावे लागेल कोणत्याही कारणास्तव विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. सभागृह वा परिसरात उपलब्ध असलेल्या विद्युत व्यवस्थे व्यतिरिक्त आयोजकाव्दारे अतिरिक्त विद्युत व्यवस्था/ध्वनी प्रक्षेपनास परवानगी राहणार नाही.

१४.सभागृहातील अनपेक्षितपणे उद्‌भवणाऱ्या तांत्रिक बिघाडामुळे प्रयोग बंद पडून प्रेक्षकांनी पैसे परत घेतल्यास, अर्जदाराचे भाडे पुढील प्रयोगात समायोजित केले जाईल परंतु अर्जदाराकडून झालेल्या विलंबामुळे किंवा इतर कारणामुळे प्रयोग रद्द झाल्यास भाडे समायोजित वा परत केले जाणार नाही. तसेच अनामत रक्कम सुध्दा नियमावतील बाब क्र. २६ प्रमाणे कपातीस पात्र राहील.

१५.प्रत्येक कार्यक्रमाकरिता आवश्यक तेवढे व्दारपाल/तिकीट तपासणीसची व्यवस्था अर्जदारास करावी लागेल.

१६.सभागृहात उपलब्ध असलेल्या सोयी व्यतिरिक्त लागणारी व्यवस्था अर्जदारास व्यवस्थापकाच्या पूर्वानुमतीने करावी लागेल व त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदाराची राहील व यामुळे सभागृहाचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी अर्जदाराची राहील व नुकसान झाल्यास त्याची भरपाई अनामत रकमेतून कपात करण्यात येईल व त्यापेक्षा जास्त राशी असल्यास ती रक्कम थकबाकी म्हणून अर्जदाराकडून वसूल करण्यात येईल.

१७.सभागृह वा परिसरात कॅमेरा, शिरस्त्राण (हेल्मेट), बंदुक, आगपेटी, लायटर किंवा ज्वलनशील वस्तु, तंबाकुजन्य पदार्थ बाळगणे, थुंकणे, धुम्रपान करणे तसेच बाहय खाद्य पदार्थ नेणे यास मनाई आहे. गरम पेय अथवा शीतपेय व खाद्य पदार्थ सभागृहातील अधिकृत उपहारगृहा मधून मिळण्याची व्यवस्था उपलब्ध असल्यास त्याचा वापर करता येईल मात्र अर्जदारास सभागृहाच्या परिसरात कुठलाही खाद्य पदार्थ तयार करून वाटप करण्यास सक्त मनाई आहे. अशा स्वरूपाच्या घटना आढळल्यास, दंडात्मक कार्यवाही व झालेल्या नुकसानाची भरपाई अनामत रकमेतून करण्यात येईल.

१८.सभागृह, सभागृहाच्या परिसरातील आंतर व बाहय भिंतीवर कोठेही खीळे ठोकून वा भिंतीपत्रके चिटकवून कार्यक्रमाची जाहिरात करण्यात मनाई आहे. अशा स्वरूपाचे वर्तन

निदर्शनास आल्यास त्याकरिता झालेल्या नुकसानीसाठी अनामत रकमेतून कपात करण्यात येईल. कार्यक्रमाच्या जाहिराती करिता ठेवण्यात आलेल्या जाहिरात फलकावरच जाहिरात लावावी लागेल. कार्यक्रमाच्या जाहिरातीचे फलक ज्या दिवशी कार्यक्रम असेल त्याच्या चार दिवसाच्या आधी सभागृहाच्या तिकीट विक्री केंद्राच्या बाजुला उपलब्ध करून दिलेल्या ठिकाणी जाहिरात फलक लावता येईल. व जाहिरातीच्या फलकाचा आकार ४ x ६ फुट पेक्षा जास्त नसावा. जाहिरातीचे फलक एकापेक्षा जास्त नसावे, जाहिरातीचे फलक सभागृहाचे आवारात इतरत्र लावल्याचे आढळल्यास अर्जदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. कार्यक्रमाचे ठिकाणी तिकीट विक्रीची व्यवस्था अर्जदारास स्वत: करावी लागेल याकरिता लागणारी जागा विनंती केल्यास कार्यक्रमाचे दिवशी उपलब्ध करून देता येईल.

१९.कार्यक्रमाच्या वेळेत तिकीट धारकास सभागृहाचे ठिकाणी प्रवेश देण्याकरिता आवश्यक तिकीट तपासणी करिता मनुष्यबळाची व्यवस्था अर्जदारास करावी लागेल. तिकीट/प्रवेश पत्रा शिवाय प्रवेश करणाऱ्या व्यक्तीस सभागृहाच्या परिसरातून घालविण्याचा अधिकार म.न.पा. च्या व्यवस्थापकीय सुरक्षा व्यवस्थेस राहील.

२०.आरक्षण केलेल्या तारखेस आरक्षण केल्यानंतर जर अतिमहत्वाचा शासकीय/महापालिकेचा कार्यक्रम आल्यास त्याची सूचना योग्यवेळी आरक्षकर्त्यास देण्यात येईल व त्याचे आरक्षण रद्द करण्यात येईल वा त्याऐवजी उपलब्ध असलेली दुसरी तारीख देण्यात येईल.

२१.आरक्षणकर्त्यानी त्यांचा कार्यक्रम आरक्षित वेळेतच संपविणे बंधनकारक आहे अन्यथा कार्यक्रम बंद करण्यात येईल व उपलब्ध केलेली व्यवस्था तात्काळ खंडीत करण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी आरक्षणकर्त्याची राहील. तसेच कार्यक्रमाचा पुढील आरक्षण कालावधी उपलब्ध असेल अशा प्रसंगी कार्यक्रमाचा पूर्वनियोजित कालावधी वाढल्यास रू. ११,०००/— प्रती तासाप्रमाणे भाडे आकारण्यात येईल व सदर रक्कम तात्काळ भरावी लागेल. कार्यक्रमा करिता आवश्यक असल्यास उपलब्ध असलेल्या खोल्या (दोन ग्रीन रूम वगळून) उर्वरित दोन ग्रीन रूम व दोन व्ही.आय.पी.रूम विनंती नुसार रू. १,५००/— प्रती स्लॉट प्रती रूम प्रमाणे भाडयाने मिळेल. तसेच परिसरातील जागा तात्पुरते स्टॉल वा मंडप इ. करून वापरावयाचे असल्यास (कुठलेही खोदकाम न करता) रू. १५/— प्रती चौरस फुट प्रती स्लॉट प्रमाणे भाडे आकारण्यात येईल. याकरिता पूर्व परवानगी घेवून भाडे आगाऊ भरणे आवश्यक राहील.

२२.सभागृह तसेच परिसरातील कोणताही भाग आरक्षण कर्त्यास कार्यालय म्हणून वापरता येणार नाही तसेच लेखी परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारचे मंडप बांधकाम/शामियाना इ. उभे करता येणार नाही.

२३.सभागृहाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सभागृह वा परिसरात कुठलेही शस्त्र वा इतर आक्षेपार्ह वस्तु असल्यास अशा व्यक्तींना प्रवेश नाकारण्याचा संपूर्ण अधिकार म.न.पा. सुरक्षा व्यवस्थापनास राहील.

२४.सर्व वाहने पार्कींग करिता उपलब्ध असलेल्या जागेतच ठेवण्यात यावीत. सभागृहाचे परिसरात अधिकृत स्टॅन्ड चे कंत्राटदार यांचेकडून प्रती वाहन आवश्यक शुल्क आकारून वाहन तळ उपलब्ध राहील. क्षमतेपेक्षा जास्त वाहने आल्यास त्याची पार्कींग व्यवस्थेची जबाबदारी संबंधित तसेच आयोजकाची राहील. सभागृहाचे ठिकाणी अधिकृत कंत्राटदार नसल्यास वाहनाची संपूर्ण जबाबदारी आयोजक/संबंधित वाहनधारकाची राहील.

२५.जमा केलेल्या भाडयाची रक्कम कोणत्याही परिस्थितीत परत मिळणार नाही. आरक्षित तारखेत बदल करावयाचा असल्यास किंवा रद्द करावयाचे असल्यास आरक्षण केलेल्या दिनांकाच्या कमीत कमी १५ दिवसापूर्वी सभागृहाचे व्यवस्थापकास लेखी अर्ज सादर करावा लागेल तरच उपलब्ध तारीख व वेळेनुसार बदल करण्याचा विचार करण्यात येईल व असे फक्त एकदाच करता येईल.

२६.अर्जदारांनी घेतलेली तारीख/सत्र कुठल्याही कारणास्तव रद्द केले अथवा बदलवून मागितले तर खालील प्रमाणे अनामत रक्कम परत केली जाईल.

अ) प्रयोगापूर्वी २५ दिवस अगोदर कळविल्यास ८० टक्के अनामत परत

ब) प्रयोगापूर्वी २० दिवस अगोदर कळविल्यास ७५ टक्के अनामत परत

क) प्रयोगापूर्वी १५ दिवस अगोदर कळविल्यास ५० टक्के अनामत परत

ड) १५ दिवसानंतर कळविल्यास अनामत रक्कम ७५ टक्के कपात होईल.

जर पुढील ३० दिवसातील तारीख उपलब्ध असल्यास, भाडे पुढे वर्ग करता येईल. मात्र कुठल्याही स्थितीत भाडे परत मिळणार नाही.

२७.सभागृहातील स्टेज समोरील वा इतर मोकळया जागेवर कुठल्याही कार्यक्रमाकरिता आयोजगांना सोफासेट/अतिरिक्त खुर्च्या लावण्यास बंदी आहे.

२८.कोणतेही कारण न देता आरक्षणाचा अर्ज निकाली काढण्याचा अधिकार तसेच वरील नियम व अटीमध्ये बदल करण्याचा अधिकार व निर्णय घेण्याचा संपूर्ण अधिकार मा. आयुक्त वा त्यांनी प्राधिकृत केलेले म.नपा. चे अधिकारी यांना राहील त्यांचा निर्णय अंतिम समजण्यात येईल व त्यामुळे आयोजक/अर्जदाराच्या होणाऱ्या नुकसानीची भरपाई विभागाव्दारे करण्यात येणार नाही.

२९. तसेच या नियमांचा अर्था बाबत अगर वापराबाबत कोणत्याही बाबतीत अर्जदार व व्यवस्थापक यांच्यात मतभेद झाल्यास त्यासंबंधी मा.आयुक्त/मा. आयुक्त व्दारा प्राधिकृत अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील व तो निर्णय अर्जदार व व्यवस्थापक यांचेवर बंधनकारक राहील.

३०.कविवर्य सुरेश भट सभागृहाचे भाडे सोबत संलग्न तक्ता " परिशीष्ट—ब " प्रमाणे राहील (शनिवार, रविवार व इतर सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून).

वरील सर्व अटी मला मान्य आहेत व मी त्याचे उल्लंघन होऊ देणार नाही.

कविवर्य सुरेश भट सभागृह
रेशिमबाग, नागपूर

परिशिष्ट— ब

विविध कार्यक्रमांकरिता सभागृह आरक्षित करण्यास्तव देय असलेल्या शुल्का बाबतचे विस्तृत विवरण अर्जदारास कविवर्य सुरेश भट सभागृह आरक्षित करण्या संबंधिचा नियमावलीतील अटी व शर्ती लागु राहतील. कार्यक्रम निहाय आकारण्यात येणारे शुल्क पुढील प्रमाणे :—

१. प्रायोगीक नाटक/ शास्त्रीय गायन / शास्त्रीय नृत्य (**Non Commercial**) :

| सत्र | सुस्थिती व देखभाल शुल्क (भाडे) | वस्तु व सेवा कर १८ % | एकूण | सुरक्षा ठेव (परतावा) |
|---|---|---|---|---|
| **सकाळ / प्रथम सत्र** | | | | |
| १९८८ (बालकनीसह) | २१००० | ३७८० | २४७८० | ५०००० |
| १५७८ (बालकनी शिवाय) | १५००० | २७०० | १७७०० | ५०००० |
| १३०० | ११००० | १९८० | १२९८० | ५०००० |
| **दुपार / दुसरे सत्र** | | | | |
| १९८८ (बालकनीसह) | २५००० | ४५०० | २९५०० | ५०००० |
| १५७८ (बालकनी शिवाय) | २१००० | ३७८० | २४७८० | ५०००० |
| १३०० | १५००० | २७०० | १७७०० | ५०००० |
| **सायंकाळ व रात्र / तिसरे व चौथे सत्र** | | | | |
| १९८८ (बालकनीसह) | ३१००० | ५५८० | ३६५८० | ५०००० |
| १५७८ (बालकनी शिवाय) | २५००० | ४५०० | २९५०० | ५०००० |
| १३०० | २१००० | ३७८० | २४७८० | ५०००० |

२. व्यवसायीक नाटक/ व्यवसायीक शास्त्रीय गायन / शास्त्रीय नृत्य/ जादूचे प्रयोग/ ऑर्केस्ट्रा /फॅशन शो (**Commercial**) :

| | सुस्थिती व देखभाल शुल्क (भाडे) | वस्तु व सेवा कर १८ % | एकूण | सुरक्षा ठेव (परतावा) |
|---|---|---|---|---|
| **सकाळ / प्रथम सत्र** | | | | |
| १९८८ (बालकनीसह) | ३१००० | ५५८० | ३६५८० | ५०००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५७८ (बालकनी शिवाय) | २१००० | ३७८० | २४७८० | ५०००० |
| १३०० | १५००० | २७०० | १७७०० | ५०००० |
| **दुपार / दुसरे सत्र** | | | | |
| १९८८ (बालकनीसह) | ३५००० | ६३०० | ४१३०० | ५०००० |
| १५७८ (बालकनी शिवाय) | २५००० | ४५०० | २९५०० | ५०००० |
| १३०० | २१००० | ३७८० | २४७८० | ५०००० |
| **सायंकाळ व रात्र / तिसरे व चौथे सत्र** | | | | |
| १९८८ (बालकनीसह) | ४५००० | ८१०० | ५३१०० | ५०००० |
| १५७८ (बालकनी शिवाय) | ३५००० | ६३०० | ४१३०० | ५०००० |
| १३०० | २५००० | ४५०० | २९५०० | ५०००० |

**३. सभा संमेलन/ परिषद/ परिचर्चा (शासनाचे उपक्रम वगळून) :—**

| | सुस्थिती व देखभाल शुल्क (भाडे) | वस्तु व सेवा कर १८ % | एकूण | सुरक्षा ठेव (परतावा) |
|---|---|---|---|---|
| **सकाळ / प्रथम सत्र** | | | | |
| १९८८ (बालकनीसह) | ४१००० | ७३८० | ४८३८० | ५०००० |
| १५७८ (बालकनी शिवाय) | ३१००० | ५५८० | ३६५८० | ५०००० |
| १३०० | २१००० | ३७८० | २४७८० | ५०००० |
| **दुपार / दुसरे सत्र** | | | | |
| १९८८ (बालकनीसह) | ४५००० | ८१०० | ५३१०० | ५०००० |
| १५७८ (बालकनी शिवाय) | ३५००० | ६३०० | ४१३०० | ५०००० |
| १३०० | २५००० | ४५०० | २९५०० | ५०००० |
| **सायंकाळ व रात्र / तिसरे व चौथे सत्र** | | | | |
| १९८८ (बालकनीसह) | ५१००० | ९१८० | ६०१८० | ५०००० |
| १५७८ (बालकनी शिवाय) | ४१००० | ७३८० | ४८३८० | ५०००० |
| १३०० | ३१००० | ५५८० | ३६५८० | ५०००० |

टीप :— तिसरे व चौथ्या सत्राकरिता एकत्रित आरक्षण केल्यास भाडे मध्ये १५ टक्के सूट देण्यात येईल.

**४. बालनाटय/स्थानिक हौशीनाटक :—**

| | सुस्थिती व देखभाल शुल्क (भाडे) | वस्तु व सेवा कर १८ % | एकूण | सुरक्षा ठेव (परतावा) |
|---|---|---|---|---|
| **सकाळ / प्रथम सत्र** | | | | |
| १९८८ (बालकनीसह) | २१००० | ३७८० | २४७८० | ५०००० |
| १५७८ (बालकनी शिवाय) | १५००० | २७०० | १७७०० | ५०००० |
| १३०० | ११००० | १९८० | १२९८० | ५०००० |
| **दुपार / दुसरे सत्र** | | | | |
| १९८८ (बालकनीसह) | २१००० | ३७८० | २४७८० | ५०००० |
| १५७८ (बालकनी शिवाय) | १५००० | २७०० | १७७०० | ५०००० |
| १३०० | ११००० | १९८० | १२९८० | ५०००० |
| सायंकाळ व रात्रीचे सत्र या कार्यक्रमाकरिता उपलब्ध राहणार नाही. | | | | |

अ शनिवार/रविवार व इतर सुटीच्या दिवशी भाडे आकारणी व नमूद आकारणी पेक्षा दीडपट राहील.

ब कुठलाही कार्यक्रम कशा प्रकारात मोडतो याबाबत व्यवस्थापकाचा निर्णय अंतिम राहील.

**५. सभागृहाच्या पूर्व बाजुस उपलब्ध असलेली मोकळी जागा सांस्कृतीक व वाङमयीन/साहीत्तीक व इतर प्रदर्शना करिता :— ( प्रती दिवस सकाळी १०.०० ते रात्री ८.३० पर्यंत )**

| जागेचे क्षेत्रफळ | सुस्थिती व देखभाल | वस्तु व सेवा | एकूण | सुरक्षा ठेव |
|---|---|---|---|---|

| | शुल्क (भाडे) | कर १८ % | | (परतावा) |
|---|---|---|---|---|
| ६०० चौ.मी. | ३०००० | ५४०० | ३५४०० | २५००० |

मोकळया जागेत आयोजकास आवश्यकतेनुसार शामियाना, स्टॉल वा प्रकाश व्यवस्था इ. करावयाची झाल्यास हा खर्च आयोजकास कोणतेही खोदकाम न करता स्वत: करावा लागेल. प्रकाश व्यवस्थेकरिता म.रा.वि.मं.कं.लि. यांचेकडून तात्पुरते विद्युत मिटर लावणे वा डीझेल जनरेटरची व्यवस्था इ. आयोजकास स्वत: करावी लागेल.

वरील सर्व अटी मला मान्य आहेत व मी त्याचे उल्लंघन होऊ देणार नाही.

**ANNEXURE-A**

**The Manager,**
**Kavivarya Suresh Bhat Auditorium,**
**Nagpur Municipal Corporation,**
**Great Nag Road, Reshimbag,**
**Nagpur.**

**Subject: - Hiring of Kavivarya Suresh Bhat Auditorium,**

**Sir,**

I/We want to book Kavivarya Suresh Bhat Auditorium for our programme as details given below:-

Name of the Party:
GST Number of Party (If any) :
Address of the Party:
Mobile & Telephone No.:
Date of the Programme:
Session I, II, III, IV :
Pan No. :
Adhar (UID) NO. :

Type of programme (i.e. Non Commercial / Commercial (Non –ticketed / No Donor Cards / No Collection of Advertisements through Brochures etc)
Is there any sponsored of the program:
Entry by Invitation Cards/ By Cards/By tickets
Receipt of fund of any Source
Exact Nature of Function/Programme
(1) Commercial Cultural Show (Give the details Musical Concert/Dances etc.)
(2) Non Commercial Cultural
(3) Conference /Annual General Body Meeting etc.
(4) Fashion Show
(5) Others Please specify
Brief Summary of the Programme:
Whether Additional Space required i.e
(1) Green Room – Number 3 at first floor
(2) V.I.P. Lounge – 1 at ground floor
(3) V.I.P. Lounge - 2 at ground floor
Details of VIP if any To inaugurate the function. (Please specify yes or no).

Payment made by RTGS (Name of Bank and Branch / MICR Code and IFSC Code) / Cash amounting to Rs………………. on account of hiring / rent charges in favour of Municipal Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur.

We undertake t abide by the terms and conditions (including revised rates if any for hiring of auditorium) governing the hiring of the Auditorium in toto and will maintain the decorum of the Auditorium.

Date:- Yours faithfully.

Encl:- 1. Transaction Receipt
2. Online registration No.
3. Copy of GST Registration No.
4. Adhar Card Copy
5. Pan Card Copy

UNDERTAKING

This is to inform you that we have booked Kavivarya Suresh Bhat Auditorium (KSBA) for audience capacity on ………………..from ……………… to ………………..p.m. under the category"……………………………………………".

I / we give undertaking that I / we will be wholly responsible for any content being played / singing / shown during the programme in the KSBA. Nagpur Municipal Corporation will not be liable for any issues related to violation of copy rights and intellectual property rights act arising out of the contents of the programme. Further we take full responsibility for depositing GST with regard to sale of tickets / sponsored programme to the GST Department.

The Nagpur Municipal Corporation would in no way have any responsibility or bearing on any of programmes being organized by us.

**वरिल विषयाचा प्रश्न टिप सह विचारात घेवून स्थायी समितीने खालील प्रमाणे सूचविलेल्या बदलासह एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येते. तसेच यापूढे सभागृहाचे संचालन क्रिडा व सांस्कृतिक विभागाने नियमावलीचे अधीन राहून करण्याची प्रक्रीया करावी. यासह ही स्थायी समिती प्रस्तावित विषयास एकमताने मंजूरी प्रदान करते.**

**<u>नियमावली</u>**

१. **सभागृहाची आसन क्षमता २००० असून लाकडी पृष्ठभागाचा ३२३० चौ.फुट/३०० चौ.मी. आकाराचा रंगमंच आहे. या सभागृहाचा वापर नाटक, संगीत, नृत्य, संम्मेलन, सांस्कृतिक व अध्यात्मिक व्याख्याने, व्यावसायीक चर्चासत्र इत्यादी कार्यक्रमा करिता करता येईल. कोणत्या प्रकारचा कार्यक्रम करावयाचा आहे याबाबतची माहिती सभागृहाचे आरक्षण करतेवेळी देणे सक्तीचे आहे. ज्या कार्यक्रमाकरिता सभागृह आरक्षित केलेले आहे त्याशिवाय इतर अन्य कार्यक्रमाला सभागृह उपलब्ध होणार नाही.**

२. **सभागृहाचे आरक्षण (सभागृहाचे आरक्षण) जास्तीत कार्यक्रमाच्या ४५दिवस व कमीत कमी ५ दिवस अगोदर करता येईल. या कालावधीतच अर्ज करावा, ४५ दिवसांपूर्वी कोणताही अर्ज स्विकारल्या जाणार नाही वा त्यावर कोणतीही कार्यवाही होणार नाही.**

३. **सभागृहाचे आरक्षणाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करणे अनिवार्य राहील (परिशिष्ट-अ).**

४. **राष्ट्रीय महत्वाचे दिवस जसे- २६ जानेवारी, १ मे, व १५ ऑगस्ट या दिवसाचे आरक्षण स्विकारण्यात येणार नाही तसेच म.न.पा. निश्चित करेल अशा काही दिवशी आरक्षण स्विकारण्यात येणार नाही.**

५. **आरक्षणाचे भाडेसह परिशिष्ट 'ब' मध्ये नमुद प्रमाणे अनामत रक्कम (परतावा/**Security deposit**) आकारण्यात येईल. ही रक्कम सभागृहाचे कुठलेही नुकसान न झाल्यास परत करण्यात येईल.**

६. **सभागृहाचे आरक्षण सकाळी ८.३० ते ११.३०, दुपारी १२.३० ते ३.३० सायंकाळी ४.३० ते ७.३० व रात्री ८.३० ते ११.३० या कालावधी करिता करण्यात येईल. प्रत्येक कालावधी करिता सोबत संलग्न तक्त्याप्रमाणे भाडे व सुरक्षा ठेव आकारण्यात येईल (परिशीष्ट-ब). पूर्ण रक्कम रोखीने/आर.टी.जी.एस.व्दारे भरल्यावर पावती प्राप्त केल्याशिवाय आरक्षण पक्के झाले असे समजल्या जाणार नाही.**

७. **आरक्षित केलेला कार्यक्रम सुरू होण्याचा अर्धा तास अगोदर सभागृह उपलब्ध करून देण्यात येईल. आरक्षित कालावधी नंतर जास्तीत जास्त अर्धा तासाचे आंत सभागृह संपूर्णता रिकामे करावे लागेल, अन्यथा दंडात्मक कार्यवाही केली जाईल. नोंदणी रजिस्टर मध्ये सभागृहाचा ताबा घेण्याची व सोडण्याची वेळ नोंद करून अर्जदाराने स्वाक्षरी करणे आवश्यक राहील. सभागृहाच्या जबाबदार व्यक्तीकडून वेळेच्या नोंदीची खात्री अर्जदाराने करावी अन्यथा कर्मचाऱ्यानी नोंदविलेली वेळ ग्राहय धरुन भाडे आकारण्यात येईल.**

८. **प्रयोगा संदर्भात सर्व श्रमीक कायदे व शासकीय नियमांचे पालन करण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील. कार्यक्रमा करिता लागणारे सर्व आवश्यक परवाने, आवश्यक मान्यता संबंधित विभागाकडून जसे- (१) मा. पोलीस आयुक्त, यांचेकडील परफार्मन्स् व ध्वनिक्षेपक परवाना (२) रंगभुमी परिनिरीक्षण मंडळ प्रमाणपत्र (३) इतर आवश्यक ते शासकीय प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील तसेच अर्जदारानी प्राप्त केलेल्या परवानगीच्या प्रती कार्यक्रमाच्या २४ तासांपूर्वी व्यवस्थापकाकडे जमा करणे आवश्यक राहील. अन्यथा कार्यक्रम करता येणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.**

९. आवश्यक असल्यास पोलीस मदतीची व्यवस्था अर्जदाराने केली पाहिजे, प्रसंगी पोलीस मदतीची आवश्यकता भासल्यास, व्यवस्थापक पोलीस मदत मागवतील व त्यापोटी आलेला संपूर्ण खर्च अर्जदारास द्यावा लागेल.

१०. महानगरपालिका/शासनाच्या अधिकृत अधिकाऱ्यांना सभागृहाच्या वापराबाबत नियंत्रणासाठी मुक्त प्रवेश राहील. तसेच प्रत्येक कार्यक्रमाकरिता रंगभुमी परिनिरीक्षण मंडळाचे सदस्य व महानगरपालिके करिता सभागृहाच्या बैठक व्यवस्थेच्या नकाशावर दाखविल्या प्रमाणे आसन क्र. AA- 8-9, AB- 1 to 5, AI- 19 to 23, AJ 11 to 15, BA- 16 to 20, एकूण २२ आसन (१.१०:) व्यवस्थापने करिता मुक्त राखुन ठेवावी लागेल त्याबाबतच्या पासेस सभागृहाच्या व्यवस्थापकाकडे कार्यक्रमाच्या कमीत कमी तीन दिवस आधी देण्यात याव्यात अन्यथा त्याची रक्कम अर्जदाराच्या अनामत रकमेतून कपात करण्यात येईल.

११. आरक्षण करतेवेळी कार्यक्रमाच्या जाहीर केलेल्या प्रकारा व्यतिरिक्त दुसरा कार्यक्रम होत असल्याचे आढळल्यास तसेच जाहिरात अथवा कार्यक्रम शासनाच्या/ महापालिकेच्या प्रतिष्ठेला बाधा येणारा वाटल्यास अथवा कार्यक्रमात अशिलल किंवा तत्सम प्रकार आढळल्यास जमा केलेली रक्कम परत न करता कार्यक्रम कोणत्याही वेळेस बंद अथवा रद्द करण्याचा अधिकार व्यवस्थापकास राहील व होणाऱ्या नुकसानीची संपूर्ण जबाबदारी अर्जदारावर राहील तसेच आवश्यकते नुसार पोलीस कार्यवाहीपण करण्यात येईल. ( संलग्न असलेले शपथपत्र सादर करावे लागेल.)

१२. प्रयोगाच्या जाहिरातीमध्ये व तिकीटावर प्रयोग सादर करणाऱ्या संस्थेचे नांव असणे सक्तीचे आहे. एखादा कार्यक्रम मोफत असल्यास तसा उल्लेख अर्ज करतांनाच अर्जावर व तिकीटावर करणे आवश्यक राहील.

१३. जास्तीची विद्युत व्यवस्था तसेच कार्यक्रम ध्वनीमुद्रीत करावयाचा असल्यास कार्यकारी अभियंता (विद्युत) विभागाकडून पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे व याकरिता अतिरिक्त शुल्क द्यावे लागेल कोणत्याही कारणास्तव विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. सभागृह वा परिसरात उपलब्ध असलेल्या विद्युत व्यवस्थे व्यतिरिक्त आयोजकाव्दारे अतिरिक्त विद्युत व्यवस्था/ध्वनी प्रक्षेपनास परवानगी राहणार नाही.

१४. सभागृहातील अनपेक्षितपणे उद्भवणाऱ्या तांत्रिक बिघाडामुळे प्रयोग बंद पडून प्रेक्षकांनी पैसे परत घेतल्यास, अर्जदाराचे भाडे पुढील प्रयोगात समायोजित केले जाईल परंतु अर्जदाराकडून झालेल्या विलंबामुळे किंवा इतर कारणामुळे प्रयोग रद्द झाल्यास भाडे समायोजित वा परत केले जाणार नाही. तसेच अनामत रक्कम सुध्दा नियमावतील बाब क्र. २६ प्रमाणे कपातीस पात्र राहील.

१५. प्रत्येक कार्यक्रमाकरिता आवश्यक तेवढे व्दारपाल/तिकीट तपासणीसची व्यवस्था अर्जदारास करावी लागेल.

१६. सभागृहात उपलब्ध असलेल्या सोयी व्यतिरिक्त लागणारी व्यवस्था अर्जदारास व्यवस्थापकाच्या पूर्वानुमतीने करावी लागेल व त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदाराची राहील व यामुळे सभागृहाचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी अर्जदाराची राहील व नुकसान झाल्यास त्याची भरपाई अनामत रकमेतून कपात करण्यात येईल व त्यापेक्षा जास्त राशी असल्यास ती रक्कम थकबाकी म्हणून अर्जदाराकडून वसूल करण्यात येईल.

१७. सभागृह वा परिसरात कॅमेरा, बंदुक, आगपेटी, लायटर किंवा ज्वलनशील वस्तु, तंबाकुजन्य पदार्थ बाळगणे, थुंकणे, धुम्रपान करणे तसेच बाहय खाद्य पदार्थ नेणे यास मनाई आहे. गरम पेय अथवा शीतपेय व खाद्य पदार्थ सभागृहातील अधिकृत उपहारगृहा मधून मिळण्याची व्यवस्था उपलब्ध असल्यास त्याचा वापर करता येईल मात्र अर्जदारास सभागृहाच्या परिसरात कुठलाही खाद्य पदार्थ तयार करून वाटप करण्यास सक्त मनाई आहे. अशा स्वरूपाच्या घटना आढळल्यास, दंडात्मक कार्यवाही व झालेल्या नुकसानाची भरपाई अनामत रकमेतून करण्यात येईल.

१८. सभागृह, सभागृहाच्या परिसरातील आंतर व बाहय भिंतीवर कोठेही खीळे ठोकून वा भिंतीपत्रके चिटकवून कार्यक्रमाची जाहिरात करण्यात मनाई आहे. अशा स्वरूपाचे वर्तन निदर्शनास आल्यास त्याकरिता झालेल्या नुकसानीसाठी अनामत रकमेतून कपात करण्यात येईल. कार्यक्रमाच्या जाहिराती करिता ठेवण्यात आलेल्या जाहिरात फलकावरच जाहिरात लावावी लागेल. कार्यक्रमाच्या जाहिरातीचे फलक ज्या दिवशी कार्यक्रम असेल त्याच्या चार दिवसाच्या आधी सभागृहाच्या तिकीट विक्री केंद्राच्या बाजुला उपलब्ध करून दिलेल्या ठिकाणी जाहिरात फलक लावता येईल. व जास्तीत जास्त दोन प्रसिध्दी फलकाचा आकार ४ x ६ फुट पेक्षा जास्त नसावा. जाहिरातीचे फलक एकापेक्षा जास्त नसावे, जाहिरातीचे फलक सभागृहाचे आवारात इतरत्र लावल्याचे आढळल्यास अर्जदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. कार्यक्रमाचे ठिकाणी तिकीट विक्रीची व्यवस्था अर्जदारास स्वतः करावी लागेल याकरिता लागणारी जागा विनंती केल्यास कार्यक्रमाचे दिवशी उपलब्ध करून देता येईल.

१९. कार्यक्रमाच्या वेळेत तिकीट धारकास सभागृहाचे ठिकाणी प्रवेश देण्याकरिता आवश्यक तिकीट तपासणी करिता मनुष्यबळाची व्यवस्था अर्जदारास करावी लागेल. तिकीट/प्रवेश पत्रा शिवाय प्रवेश करणाऱ्या व्यक्तीस सभागृहाच्या परिसरातून घालविण्याचा अधिकार म.न. पा.च्या व्यवस्थापकीय सुरक्षा व्यवस्थेस राहील.

२०. आरक्षण केलेल्या तारखेस आरक्षण केल्यानंतर जर अतिमहत्वाचा शासकीय/महापालिकेचा कार्यक्रम आल्यास त्याची सूचना योग्यवेळी आरक्षकर्त्यास देण्यात येईल व त्याचे आरक्षण रद्द करण्यात येईल वा त्याऐवजी उपलब्ध असलेली दुसरी तारीख देण्यात येईल.

२१. आरक्षणकर्त्यानी त्यांचा कार्यक्रम आरक्षित वेळेतच संपविणे बंधनकारक आहे अन्यथा कार्यक्रम बंद करण्यात येईल व उपलब्ध केलेली व्यवस्था तात्काळ खंडीत करण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी आरक्षणकर्त्याची राहील. तसेच कार्यक्रमाचा पुढील आरक्षण कालावधी उपलब्ध असेल अशा प्रसंगी कार्यक्रमाचा पूर्वनियोजित कालावधी वाढल्यास रू. ११,०००/- प्रती तासाप्रमाणे भाडे

आकारण्यात येईल व सदर रक्कम तात्काळ भरावी लागेल. कार्यक्रमा करिता आवश्यक असल्यास उपलब्ध असलेल्या खोल्या (दोन ग्रीन रूम वगळून) उर्वरित दोन ग्रीन रूम व दोन व्ही.आय.पी.रूम विनंती नुसार रू. १,५००/- प्रती स्लॉट प्रती रूम प्रमाणे भाडयाने मिळेल. तसेच परिसरातील जागा तात्पुरते स्टॉल वा मंडप इ. करून वापरावयाचे असल्यास (कुठलेही खोदकाम न करता) रू. १५/- प्रती चौरस फुट प्रती स्लॉट प्रमाणे भाडे आकारण्यात येईल. याकरिता पूर्व परवानगी घेवून भाडे आगाऊ भरणे आवश्यक राहील.

२२. सभागृह तसेच परिसरातील कोणताही भाग आरक्षण कर्त्यास कार्यालय म्हणून वापरता येणार नाही तसेच लेखी परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारचे मंडप बांधकाम/शामियाना इ. उभे करता येणार नाही.

२३. सभागृहाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सभागृह वा परिसरात कुठलेही शस्त्र वा इतर आक्षेपार्ह वस्तु असल्यास अशा व्यक्तींना प्रवेश नाकारण्याचा संपूर्ण अधिकार म.न.पा. सुरक्षा व्यवस्थापनास राहील.

२४. सर्व वाहने पार्कींग करिता उपलब्ध असलेल्या जागेतच ठेवण्यात यावीत. सभागृहाचे परिसरात अधिकृत स्टॅन्ड चे कंत्राटदार यांचेकडून प्रती वाहन आवश्यक शुल्क आकारून वाहन तळ उपलब्ध राहील. क्षमतेपेक्षा जास्त वाहने आल्यास त्याची पार्कींग व्यवस्थेची जबाबदारी संबंधित तसेच आयोजकाची राहील. सभागृहाचे ठिकाणी अधिकृत कंत्राटदार नसल्यास वाहनाची संपूर्ण जबाबदारी आयोजक/संबंधित वाहनधारकाची राहील.

२५. जमा केलेल्या भाडयाची रक्कम कोणत्याही परिस्थितीत परत मिळणार नाही. आरक्षित तारखेत बदल करावयाचा असल्यास किंवा रद्द करावयाचे असल्यास आरक्षण केलेल्या दिनांकाच्या कमीत कमी १५ दिवसापूर्वी सभागृहाचे व्यवस्थापकास लेखी अर्ज सादर करावा लागेल तरच उपलब्ध तारीख व वेळेनुसार बदल करण्याचा विचार करण्यात येईल व असे फक्त एकदाच करता येईल.

२६. अर्जदारांनी घेतलेली तारीख/सत्र कुठल्याही कारणास्तव रद्द केले अथवा बदलवून मागितले तर खालील प्रमाणे अनामत रक्कम परत केली जाईल.

अ) प्रयोगापूर्वी २५ दिवस अगोदर कळविल्यास ८० टक्के अनामत परत

ब) प्रयोगापूर्वी २० दिवस अगोदर कळविल्यास ७५ टक्के अनामत परत

क) प्रयोगापूर्वी १५ दिवस अगोदर कळविल्यास ५० टक्के अनामत परत

ड) १५ दिवसानंतर कळविल्यास अनामत रक्कम ७५ टक्के कपात होईल.

जर पुढील ३० दिवसातील तारीख उपलब्ध असल्यास, भाडे पुढे वर्ग करता येईल. मात्र कुठल्याही स्थितीत भाडे परत मिळणार नाही.

२७. सभागृहातील स्टेज समोरील वा इतर मोकळया जागेवर कुठल्याही कार्यक्रमाकरिता आयोजकांना सोफासेट/अतिरिक्त खुर्च्या लावण्यास बंदी आहे.

२८. कोणतेही कारण न देता आरक्षणाचा अर्ज निकाली काढण्याचा अधिकार तसेच वरील नियम व अटीमध्ये बदल करण्याचा अधिकार व निर्णय घेण्याचा संपूर्ण अधिकार मा. आयुक्त वा त्यांनी प्राधिकृत केलेले म.नपा. चे अधिकारी यांना राहील त्यांचा निर्णय अंतिम समजण्यात येईल व त्यामुळे आयोजक/अर्जदाराच्या होणाऱ्या नुकसानीची भरपाई विभागाव्दारे करण्यात येणार नाही.

२९. तसेच या नियमांचा अर्था बाबत अगर वापराबाबत कोणत्याही बाबतीत अर्जदार व व्यवस्थापक यांच्यात मतभेद झाल्यास त्यासंबंधी मा. आयुक्त/मा. आयुक्त व्दारा प्राधिकृत अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील व तो निर्णय अर्जदार व व्यवस्थापक यांचेवर बंधनकारक राहील.

३०. कविवर्य सुरेश भट सभागृहाचे भाडे सोबत संलग्न तक्ता " परिशिष्ट-ब " प्रमाणे राहील.

वरील सर्व अटी मला मान्य आहेत व मी त्याचे उल्लंघन होऊ देणार नाही.

आयोजकाची स्वाक्षरी /

दिनांक : संस्था पदाधिकाऱ्यांची स्वाक्षरी व शिक्का.

**परिशिष्ट- ब**

(अ) प्रायोगिक नाटक / शास्त्रीय गायन / शास्त्रीय नृत्य / बाल नाटय / स्थानिक हौशीनाटक/संपूर्ण अनुदानीत, शासकीय पूर्व प्राथमिक / प्राथमिक/माध्यमिक शाळा (खाजगी शाळांकरीता हे शुल्क लागु नाही) यांचे सांस्कृतीक कार्यक्रम / शरीर सौष्ठव स्पर्धा / कवि सम्मेलन / शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम व कार्याशाळा आयोजन / नाटय परिषद / साहित्य संघ व चॅरीटेबल ट्रस्ट व्दारा आयोजीत सांस्कृतिक कार्यक्रम (Non Commercial) तिकीट व देणगी शुल्क न आकारता करण्यात येणारे वरील स्वरूपाचे कार्यक्रम )

| आसन क्षमता | भाडे | सुरक्षा ठेव (परतावा) |
|---|---|---|
| १३०० | ५००० | १५००० |

| | | |
|---|---|---|
| १५७८ (बालकनी शिवाय) | ११००० | २५००० |
| १९८८ (बालकनीसह) | १५००० | २५००० |

**टिप :-**

१. प्रत्येक शनिवारी सायंकाळ सत्र ४.३० ते ७.३० व ८.३० ते ११.३० या सत्रांकरिता वर नमूद शुल्काचे दिडपट भाडे या श्रेणी करिता आकारण्यात येईल.

२. प्रत्येक रविवार व सार्वजनिक सुटयांच्या दिवशी या श्रेणींच्या कार्यक्रमांकरिता आरक्षण उपलब्ध राहणार नाही.

**(ब) व्यावसायीक नाटक / शास्त्रीय गायन / शास्त्रीय नृत्य / ऑर्केस्ट्रा / जादूचे प्रयोग / कवि सम्मेलन / सांस्कृतीक परिचर्चा /** Talk Show / **एकपात्री नाटय व तत्सम (**Commercial- **तिकीट किंवा देणगी शुल्क आकारून होणारे कार्यक्रम) राजकीय संमेलन व मेळावे (निवडणूक काळातील प्रचार सभा वगळून) प्रवचने / विविध सामाजिक संस्थांव्दारे आयोजित कार्यक्रम / विविध शासकीय, निमशासकीय, महामंडळ** (शासनाचे उपक्रम), यांचे व्दारो आयोजित **सांस्कृतिक तथा लोकजागृती संबंधातील कार्यक्रम :**

टिप :- फक्त शासकीय / निमशासकीय / महामंडळ (शासनाचे उपक्रम) इ. करिता कार्यक्रमाचे स्वरूप विचारात घेवून शुल्कातून सूट देण्याचे अधिकार आयुक्त, म.न.पा. यांना राहतील.

| आसन क्षमता | भाडे | सुरक्षा ठेव (परतावा) |
|---|---|---|
| १३०० | २५००० | ५०००० |
| १५७८ (बालकनी शिवाय) | ३०००० | ५०००० |
| १९८८ (बालकनीसह) | ४०००० | ५०००० |

टिप :- या श्रेणीतील कार्यक्रमांकरिता संपूर्ण दिवसाकरिता आरक्षण केल्यास, एकूण चार सत्रातील कार्यक्रमाच्या आकारण्यात येणाऱ्या शुल्काचे राशीवर १० टक्के सूट देण्यात येईल.

(क) विविध व्यावसायिक (Professional) क्षेत्रातील (जसे- वैद्यकीय, तांत्रिक, चार्टड अकाऊंटंटस् इ. तत्सम) संमेलन, परिषद, परीचर्चा, कार्यशाळा इत्यादी / फॅशन शो / दिक्षांत समारोह / **खाजगी शाळांचे**, महाविद्यालय, विद्यापीठ व्दारा आयोजित सांस्कृतिक / शैक्षणीक कार्यक्रम / **वृत्तपत्र समुह तसेच व्यापारी प्रतिष्ठानव्दारा आयोजीत Events,**

| आसन क्षमता | भाडे | सुरक्षा ठेव (परतावा) |
|---|---|---|
| १३०० | ४०००० | १००००० |
| १५७८ (बालकनी शिवाय) | ६०००० | १००००० |
| १९८८ (बालकनीसह) | ७५००० | १००००० |

टिप :- या श्रेणीतील कार्यक्रमांकरिता संपूर्ण दिवसाकरिता आरक्षण केल्यास, एकूण चार सत्रातील कार्यक्रमाच्या आकारण्यात येणाऱ्या शुल्काचे राशीवर २० टक्के सूट देण्यात येईल.

**सभागृहाच्या पूर्व बाजुस उपलब्ध असलेली मोकळी जागा सांस्कृतीक व वाङमयीन/साहीत्यिक व इतर प्रदर्शना करिता :- ( प्रती दिवस सकाळी १०.०० ते रात्री ८.३० पर्यंत )**

| जागेचे क्षेत्रफळ | भाडे | सुरक्षा ठेव (परतावा) |
|---|---|---|
| ६०० चौ.मी. | ३०००० | २५००० |

मोकळया जागेत आयोजकास आवश्यकतेनुसार शामियाना, स्टॉल वा प्रकाश व्यवस्था इ. करावयाची झाल्यास हा खर्च आयोजकास कोणतेही खोदकाम न करता स्वतः करावा लागेल. प्रकाश व्यवस्थेकरिता म.रा.वि.मं.कं.लि. यांचेकडून तात्पुरते विद्युत मिटर लावणे वा डीझेल जनरेटरची व्यवस्था इ. आयोजकास स्वतः करावी लागेल.

**टिप :-**

१. सर्व श्रेणींच्या कार्यक्रमांकरिता व मोकळया जागेतील कार्यक्रमांकरिता वरील प्रमाणे मुळ शुल्काशिवाय प्रचलित दराप्रमाणे वस्तु व सेवाकर (G.S.T.) वेगळा आकारण्यात येईल.

२. वरील सर्व दर पुढील एक (१) वर्षाकरीता राहतील.

३. नागपूर शहरातील सामाजिक व सांस्कृतीक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्थांना One Time Security Deposit ची सोय उपलब्ध करून देता येईल. मात्र ही ठेव (Security Deposit) रक्कम बिन व्याजी कमीत कमी रू. १.०० (एक) लक्ष राहील यप्रमाणे ठेव रक्कम भरणाऱ्या संस्थांना भाडयात सुट किवा आरक्षणात प्राधान्य दिल्या जाणार नाही व दरवर्षी च्या ३१ मार्चला या संदर्भातील आर्थीक व्यवहाराचा आढावा घेण्यात येईल.

**ANNEXURE-A**

**T0,**
**The Manager,**
**Kavivarya Suresh Bhat Auditorium,**
**Nagpur Municipal Corporation,**
**Great Nag Road, Reshimbag,**
**Nagpur.**

**Subject: - Hiring of Kavivarya Suresh Bhat Auditorium,**

**Sir,**

I/We want to book Kavivarya Suresh Bhat Auditorium for our programme as details given below:-

Name of the Party:
GST Number of Party (If Registered) :
Address of the Party:
Mobile & Telephone No.: (Office bearers or individual as case may be)

Date of the Programme:
Session I, II, III, IV :
Registration No. :-

Pan No. : (Registered institute or its officer bearers or individual)

Adhar (UID) NO. : (If Individual)

Type of programme (i.e. Non Commercial / Commercial (Non –ticketed / No Donor Cards / No Collection of Advertisements through Brochures etc)
Is there any sponsored of the program:
Entry by Invitation Cards/ By Cards/By tickets
Receipt of fund of any Source :-
Capasity :- 1988/1578/1300
Exact Nature of Function/Programme
(1) Commercial Cultural Show (Give the details Musical Concert/Dances etc.)
(2) Non Commercial Cultural
(3) Conference /Annual General Body Meeting etc.
(4) Fashion Show
(5) Others Please specify
Brief Summary of the Programme:
Whether Additional Space required i.e
(1) Green Room – Number 3 at first floor
(2) V.I.P. Lounge – 1 at ground floor
(3) V.I.P. Lounge - 2 at ground floor
Details of VIP if any To inaugurate the function. (Please specify yes or no).

Payment made by RTGS (Name of Bank and Branch / MICR Code and IFSC Code) / Cash amounting to Rs………………. on account of hiring / rent charges in favour of Municipal Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur.

We undertake t abide by the terms and conditions (including revised rates if any for hiring of auditorium) governing the hiring of the Auditorium in toto and will maintain the decorum of the Auditorium.

Date:- Yours faithfully.

Encl:-
1. Registration No. of the institution
2. Copy of GST Registration No. (If Registered)
3. Adhar Card Copy (If Individual)
4. Pan Card Copy (Of the office bearers or individual as case may be)

(Rs. 100/- Stamp paper)

**UNDERTAKING**

This is to inform you that we have booked Kavivarya Suresh Bhat Auditorium (KSBA) for audience capacity on ………………..from ……………… to ………………..p.m. under the category"…………………………………………..….".

I / we give undertaking that I / we will be wholly responsible for any content being played / singing / shown during the programme in the KSBA. Nagpur Municipal Corporation will not be liable for any issues related to violation of copy rights and intellectual property rights act arising out of the contents of the programme. Further we take full responsibility for depositing GST with regard to sale of tickets / sponsored programme to the GST Department.

The Nagpur Municipal Corporation would in no way have any responsibility or bearing on any of programmes being organized by us.

We also undertake that, we hereby agree to abide by all the terms & conditions late down for hiring of this auditorium.

Date:- Signature of the Organizer with seal

<u>ठराव क्रमांक 198</u>:— Regional Centre for Urban environmental studies. All India
<u>{आरोग्य विभाग}</u> Inst. Of local self Govt. Mumbai या संस्थेमार्फत Sanitation, Sewerage, drainage, water supply इत्यादी field मध्ये technical support DPR तयार करणे तथा प्रशिक्षण देणे याकरीता मनपाच्या पॅनलवर निश्चित मानधनावर नियुक्त करण्याबाबत प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सदर संस्था सध्यास्थितीत पूणे, कल्याण, डोंबिवली इत्यादी मनपात सल्लागार म्हणुन कार्य करते असे समजले. तथापि नागपूर मनपा करीता संस्थेने Visiting Consultant म्हणुन काम करण्याची तयारी दर्शविली आहे. या अंतर्गत ३ ते ४ महिन्यातुन २ ते ३ लोकांचे पथक शहरात राहून २ ते ३ दिवस कामकाज करणे अभीप्रेत आहे. सरासरी १५ दिवसात १ visit याप्रमाणे अंदाजे ४ महिन्यात ८ visit विचारात घेवून ८.८० लक्ष अधिक कर ऐवढया खर्चाचे प्राकलन प्रस्तावीत आहे. प्रस्तावित कामावर येणारा खर्च खालील तक्त्यात कामाच्या टप्पावर प्रतिशत भागाप्रमाणे भुगतान करणे अभिप्रत आहे.

| Sr.No. | Scope of work. | Payment. |
|---|---|---|
| 1 | Inception visit – understanding the current scenario (completed on 18th August 2017) | 10% |
| 2 | Finalizing month wise strategies and activities and discussion on draft action plan | |
| 3 | Presentation of survekshan guidelines and final action plan to the ULB staff and elected representatives | 30% |
| 4 | Review of action and documentation of on-ground efforts | |
| 5 | Follow up with ULB staff regarding work completed as per action plan | |
| 6 | Draft presentation | 30% |
| 7 | Follow up with ULB staff. Workshop for preparing ULB staff for SS10 assessment parameters (NMC to organize workshop at NMC office) | |
| 8 | Organization of necessary documents for assessment of SS18 and final presentation | 30% |

सदर खर्च A24001220302 पदातर्गत भागवणे प्रस्तावित आहे.

मनपा क्षेत्रात शहरातील स्वच्छता व प्राथमिक सुविधांचे बळकटीकरण करण्यास Regional Centre for Urban environmental Studies, All India Institute of Local Self-Govt. Mumbai या संस्थेमार्फत अन्य मनपाच्या कामकाज प्रणालीच्या धरतीवर नागपूर शहरात सुध्दा अवलंब करण्यात यावा स्वच्छ सर्वेक्षण २०१८ करीता हाती उपलब्ध अल्प कालावधी विचारात घेता मा. स्थायी समीतीच्या मान्यतेने सदर संस्थेला निविदा न मागविता थेट काम देण्याची शिफारस आहे. वरील प्रमाणे प्रस्ताव विचारात घेण्याकरीता सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन, यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 199</u>:— पंचशील चौक ते लोकमत चौका पर्यंत उड्डान पुलाखाली
<u>{वाहतूक विभाग}</u> व रस्त्याचे बाजुला पे ॲण्ड पार्ककरीता मे. कनक स्कुटर पार्किंग प्रो. श्री प्रकाश अंचलवार यांची Offset दरा पेक्षा 20.62% अधिकची असलेली रू. 32,56,776/— ची महत्तम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 200</u>:— नागपूर उत्तर मतदार क्षेत्रातील नारी येथे सुगतनगर
<u>{लोककर्म झोन 09}</u> भागातील धम्मसुगती केंद्रातील पहिल्या माळयावर विपश्यना हॉल चे ध्वनी व्यवस्थापन करणे व मौजा नारी, खसरा क्र. 132 वर नविन हॉल व संरक्षण भिंतीचे काम करणेचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 72,46,042/— पेक्षा 3.15 टक्के कमी दराची 70,17,792/—(रूपये सत्तर लक्ष सतरा हजार सातशे ब्यानव) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम शासकीय अनुदान

(महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोयींच्या विकासासाठी विशेष तरतूद) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 201:— {लोककर्म झोन क्र. 10} प्रभाग क्र ११, अ गोरेवाडा स्लम येथे भुमीगत पाईप लाईन टाकण्याबाबत रू. ३९,३७,४०२/— (एकोणचाळीस लक्ष सदतीस हजार चारशे दोन रू. फक्त) जुने पद क्रमांक ६२९ व नविन पद क्र. A४२००१३७४६०२ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 202:— {लोककर्म झोन क्र. 10} प्रभाग क्र ११, अ गोरेवाडा स्लम येथे सी.सी. रोडचे काम करण्याबाबत रू. ४८,००,०३१/— (अठ्ठेचाळीस लक्ष एकतीस रूपये फक्त ) जुने पद क्रमांक ६२९ व नविन पद क्र. A४२००१३७४६०२ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 203:— {लोककर्म झोन 01} प्रभाग क्र. 37 'ड' अंतर्गत प्रोसेस सुर्वेअर कॉलोनी व इतर ठिकाणी रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. २९,९९,९५७/— (एकोनतीस लक्ष, नव्यान्नव हजार, नऊशे सत्तावन फक्त) रकमेच्या प्राकलनास मंजुरी करण्याचा तसेच पद क्र. A22001330803 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 204:— {आरोग्य विभाग} भारत सरकारच्या उपक्रमाच्या अनुषंगाने SBM अंतर्गत Feedback, C.T. व P.T. चे ठिकाणी बसविण्याची प्राधीकृत केले आहे. असे Feedback Machine C.T. व P.T. येथे में. ITIL (भारत सरकार चा उपक्रम) या ऐजंन्सी मार्फत प्रस्तावित असून त्याबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

१) सदर मशिन ऐजंन्सी मार्फत प्रति महा ९४५ रु. (कर वगळून) भाडयावर उपलब्ध करुन दिले जाईल.
२) ऐजंन्सी सहा महिन्यांचे भाडे आगावु प्रदान करावे लागेल.
३) ८ ते १२ आठवडयात ऐजंन्सी मार्फत मिशनचा पुरवठा केला जाईल.
४) बेसिक इलेक्ट्रिक सप्लाई मनपाला दयावा लागेल.
५) मशिन सुरक्षितेची जबाबदारी वापरकर्त्यांची राहील. (मनपाची सुलभ सारखी ऐजंन्सी)
६) सदर मशिन लावल्यापासून ३६ महिन्यांची देखभाल दुरुस्ती ITIL मार्फत केली जाईल.

सद्यास्थितीत मनपाकडे ७४ P.T. असून ६ P.T. चे काम सुरु आहे. तर ४७ C.T. आहेत म्हणजे सद्या एकुण १२७ ठिकाणी अशी मशीन बसवायचे झाल्यास १२७ X ९४५ = १,२०,०१५ इतका प्रति माह खर्च अपेक्षित आहे. तिन वर्षासाठी दयावयाचे झाल्यास रु. ४३,२०,५४०/— ऐवढा खर्च (कर वगळता) येईल तो खर्च स्वच्छ भारत अभियान मधील क्षमता बांधणी निधीतून करण्यात येईल. सदर चे काम M/s ITI Limited (भारत सरकारचा उपक्रम) यांच्या मार्फत करायचे आहे. सदर काम विना निविदा देणे असुन त्या करीता सक्षम प्राधिकरण म्हणुन मा. स्थायी समितीच मंजुरी आवश्यक आहे. उक्त प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 205</u>:—** प्रभाग क्र ११, अ येथील महेशनगर बोरगांव येथे नाल्याचे **{लोककर्म झोन क्र. 10}** भिंतीचे बांधकाम करण्याबाबत रू. ३९,२७,२३७/— (एकोणचाळीस लक्ष सत्तावीस हजार दोनशे सदतीस रू. फक्त ) जुने पद क्रमांक ७७० व नविन पद क्र. A४२००१३७४६१५ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 206</u>** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर